I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 269-272

OPEN ACCES

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

A Double-Blind Peer Reviewed Journal

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# महिला सक्षमिकरणासाठी राष्ट्रीय धोरण

डॉ. सोमा पी. गोंडाणे

राजीव गांधी कला महाविद्यालय पाटण तालुका जिवती जिल्हा चंद्रपूर

ब्वततमेचवदकपदह ।नजीवत रू इवकीपडंदकीन/हउंपसण्बवउ

ब्वउउनदपबंजमक रू२०ण्०२ण्२०२२ | त्मअपेपवद रू १५ण्०३ण्२०२२ ।बबमचजमक रू२५ण्०३ण्२०२२ | च्नइसपीमकरू ०१ण्०४ण्२०२२

**सारांश :**

कोणत्याही समाजाच्या विकासाचा थेट संबंध त्या समाजातील महिलांच्या विकासासाठी असतो. महिलान शिवाय व्यक्ती, कुटूंब आणि समाजाच्या विकासाची कल्पनाच करता येत नाही. म्हणूनच स्त्री पुरूश समानतेचे तत्व भारतीय राज्यघटनेने स्वीकारले आहे. राज्यघटनेच्या प्रस्तावनेत तशी तरतूदही केलेली आहे. घटनेच्या प्रस्तावनेतील मुलभूत अधिकार, मुलभूत कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्वांमध्ये स्त्री-पुरूशांना समान अधिकार दिलेले आहेत. सविधान केवळ महिलांना समानतेचीच हमी देत नाही तर राज्यांना महिलांचा विकास करण्याच्या बाजूने सकारात्मक पावले उचलण्याचे निर्देशही देतो. सरकारने महिलांच्या सक्षमीकरणाकरिता विविध प्रकारचे धोरण अमलात आणलेले आहे. ज्या धोरणांमुळे महिलांचे सशक्तिकरण होऊ शकते. महिलांची प्रगती विकास आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी महिलांवरील सर्व प्रकारचे भेदभाव समाप्त करण्याचे धोरण सरकारने अमलात प्रयत्नशील आहे. तसेच पावले उचलल्याचे दिसत आह. विकास आराखडयांच्या केंद्रस्थानी महिलांना ठेवून त्यांच्याकरिता कल्याणकारी योजना राबविणे तसेच त्यांना सशक्त, स्वावलंबी, आत्मनिर्भर बनून समाजात मोकळा श्वास घेता यावा यासाठी ही सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहे.

**बीजशब्द :** महिला आयोग, वारसा हक्क, कायदेमंडळ, समान संधी, दारीद्ररेशेखली, कृशी क्षेत्र, राखीव जागा, बचत गट

**प्रस्तावना :**

लोकशाही राजकारणाच्या चौकटीत महिलांच्या उत्थानासाठी कायदे करणे, विकासात्मक धोरण ठरविणे, योजनात्मक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. पाचव्या पंचवार्शिक योजनेपासून तर महिला कल्याण कार्यक्रमा पर्यंत विकासात्मक धोरणांची मांडणी केली जात आहे. अलीकडच्या काळात महिला सक्षमिकरण हा महिलांच्या उन्नतीकरिता महत्वाचा भाग म्हणून ओळखला जातो. राश्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९० मध्ये संसदेच्या कायद्याद्वारे करण्यात आली आहे. या अंतर्गत महिलांचे हक्क आणि कायदेशीर अधिकार सुरक्षित आहेत. भारत सरकारणे विविध आंतरराश्ट्रीय मानवाधिकार योजनांना आपला पाठिंबा दिलेला आहे. ज्यामुळे महिलांच्या समान हक्कांचा मुद्दा उपस्थित करून महिलांविरूध्द सर्व प्रकारच्या भेदभावाच्या निर्मुलनाची घोशना केलेली आहे. महिलांकरिता असलेल्या चळवळी आणि तळागळात कितपत पडलेल्या महिलांच्या समस्यांची सखोल जाणिव निमशासकिय संस्थांना असून अशा प्रकारच्या संस्थांनी महिलांच्या सक्षमिकरणाकरिता प्रेरणादायी प्रयत्न केलेल्या आहे. आजही समाजामध्ये लैंगिक असमानता अल्याचे दिसून येते. कारण समाजामध्ये प्रथा परंपरा जुन्या चालीरीती यांचा प्रभाव असल्यामुळे त्यांच्यातिल लैंगिक असमानतेची भावना निघत नाही. तसचे एससी, ओबीसी, एस.टी. आणि अल्पसंख्याक समुदायातील दुर्बलघटकातील महिलांना

योग्य शिक्षण आरोग्य, उत्पादन, साधनामध्ये प्रवेश अपुरा असल्यामुळे त्यांच्यात गरिबीचे आणि सामाजिक बहीस्काराचे जिवन जगण्याची पाळी येते. म्हणून सरकारने यांच्या सबलीकरणाकरिता विविध योजना राबविल्या आहेत.

**न्यायीक कायदेशीर प्रणाली.**

घरघुती हिंसाचार आणि वैयक्तिक छळाच्या प्रकरणामध्ये महिलांना कायदेशिर न्यायिक व्यवस्था मजबुत बनविली जाईल. तसेच नविन कायद्याची अमलबजावनी जलद न्याय मिळावा आणि दोशिंना कठोरात कठोर शिक्षा मिळावी यासाठीही प्रयत्न केले जातात. विविह घटस्फोट पालकत्व इत्यादी यासारख्या वैयक्तीक कायद्यामध्ये सुधारणा करणे ज्यामुळे महिलांवरील भेदभाव दुर होईल. पुरूशप्रधान समाजत मालमत्तेच्या अधिकाराने स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. परंतू मालमत्ता आणि वारसा हक्काच्या संबंधी कायद्यामध्ये सुधारणा करून महिलांना न्याय मिळवून दिला जातो.

**निर्णय घेणे**

सत्तेच्या वाटणीमध्ये महिलांची समानता आणि निर्णय घेण्यात त्यांचा सक्रिय सहभाग निश्चित केला जातो. ज्यामुळे सक्षमिकरणाची उद्दिश्टे पुर्ण करता येतील. कायदेमंडळ, कार्यपालीका, न्यायपालिका, कार्पोरेट घटनात्मक संस्था आणि सल्लगार आयोग समित्या, मंडळे, इत्यादी सर्व स्तरावर निर्णय घेण्याच्या क्षमतेमध्ये महिलांना समान प्रवेश मिळावा यासाठी सर्व उपाययोजना केल्या जातात. उच्च विधान मंडळासह सर्व क्षेत्रामध्ये आरक्षण कोटा विचारात घेतला जावून महिलांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी मिळावी यासाठी महिला स्नेही कर्मचारी धोरण ठरविले आहे.

**महिलांचे आर्थिक सक्षमिकरण - गरीबी निर्मुलन**

भारतात राहणाऱ्या लोकसंख्येपैकी बहूतेक लोकसंख्या ही दारिद्रय रेशेखाली राहणारी लोकसंख्या आहे. आणि त्यातही स्त्रिया बहुतेक दारिद्रयरेशेखाली राहतात. बऱ्याचदा अत्यंत दारिद्रयात स्त्रिया आपले जीवन व्यस्थित करित असतात. त्याच प्रमाणे अशा स्त्रिया सामाजिक भेदभावाचा ही शिकार होत असतात. दारिद्रय निर्मुलण कार्यक्रमाद्वारे अशा या स्त्रियांच्या समस्या सोडवल्या जातात. गरिब महिलांना संघटीत करणे. आणि त्यांच्या विकासाकरिता उपाययोजना करून गरिब स्त्रियामध्ये आर्थिक क्षमता वाढविणे.

**लहान कर्ज योजना**

महिलांना उपभोग घेता यावा आणि उत्पादनासाठी कर्ज मिळावे यासाठी विविध आणि नविन शिक्षण क्रेडिट प्रणाली आणि शिक्षण व वित्त प्रणाली यांना मजबुत केल्या जाते. द्रारिद्रये रेशेखाली राहणाऱ्या महिला असतात. त्यांना सहज आणि सुलभ आर्थिक कर्ज मिळावे यासाठी सहाय्य केले जाते. आणि संबंधित बॅंकानाही तसे आदेश दिले जातात.

**महिला आणि शेती**

कृशी क्षेत्रात महिलांनी मोठया प्रमाणात उत्पादन केल्यामुळे त्यांना विविध प्रकारे प्रशिक्षण देणे. कृशी क्षेत्राशी असलेल्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचविणे आणि चांगले उत्पदन व्हावे. याकरिता सामाजिक वनीकरण मृदसंधारण यासारख्या योजना केल्या जातात. त्याच प्रमाणे कृशी क्षेत्राला पुरक असणारे फलोत्पादन, पशुपालन, कुक्कुडपालन, मत्सपालन इत्यादीमध्ये महिलांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे.

**महिला आणि उद्योग**

इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञान आणि अन्यप्रक्रिया तसेच कृशी उद्योग वस्त्र उद्योग या प्रकारच्या क्षेत्रामध्ये महिलांनी महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे. त्यामुळे या क्षेत्राचा विकास करिण्याकरिता योजना तयार केल्या आहेत. महिला विविध प्रकारच्या औद्योगिक क्षेत्रात सहभागी व्हावे या उद्येशाने त्यांना कामगार कायदा सामाजिक सुरक्षा तसेच इतर सेवामध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात मदत केली जाते.

**सहाय्यक सेवा**

महिलांना विविध प्रकारच्या सहाय्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. बाल संगोपन सुविधा तसेच कामाच्या ठिकाणी शैक्षणिक संस्थामध्ये पाळणाघरा सारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्याच प्रमाणे वृध आणि अपंग महिलांसाठी घरे तयार करून दिल्यास त्यांना सामाजिक, राजकिय आणि आर्थिक जीवनात पुर्णपणे सहकार्य केले जाते. विकास प्रक्रियेत महिलांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा म्हणून महिलांन करीता अनुकूल कर्मचारी धोरण तयार केले जातात.

**महिलांचे सामाजिक सक्षमिकरण - शिक्षण**

महिला आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून दिलया जातात. त्यांच्यातील भेदभाव दुर करण्यासाठी शिक्षणाला चालना देण्यासाठी निरक्षरता दुर करण्यासाठी वर्गातील पटसंख्या वाढविण्यासाठी वर्गात मुलींचे उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रशिक्षणासाठी गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्वप्रकारची आवश्यक पावले उचलली जातात. महिलांमधील व्यावसायीक आणि तांत्रिक क्षमता सुधारण्यासाठी तसचे माध्यमिक आणि उच्च शिक्षणातील लैंगिक भेदभाव कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. विविध क्षेत्रात वेगवेगळया व्यवसायात अनुसूचित जाती अनुसूचित जमाती इतर मागास वर्ग अल्पसंख्याक समुदायातील मुली आणि महिलांवर विशेश लक्ष केंद्रीत करून त्यांच्या विकासाच्या योजना तयार केल्या जातात.

**महिलांचे आरोग्य**

महिलांच्या आरोग्याविशयी एक संपूर्ण धोरण स्विकारले जाते. त्यामध्ये पोशण आणि आरोग्य सेवा यादोन्हीचा समावेश होतो. जिवनाच्या प्रत्येक टप्प्यावर महिला आणि मुलींच्या गरजावर विशेश लक्ष केंद्रीत केल्या जातात. बालमृत्यु आणि माता मृत्यु दर यात घट व्हावी याकरिता विशेश लक्ष केंद्रीत केल्या जाते. राश्ट्रीय लोकसंख्या धोरणानुसार महिलांना सर्वसमावेशक परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. लैंगिक आणि आरोग्य समस्या आणि विविध पसरणारे रोग जसे मलेरीया, क्षय, जलजन्य रोग उच्च रक्तदाब यासारख्या रोगावर सुध्दा विशेश लक्ष दिले जाते. अर्भक आणि माता मृत्यु बाल विवाह यासारख्या समस्येचे प्रभावी निराकरण करण्यासाठी मृत्यु-जन्म आणि विवाह नोंदणीची खडक अमलबजावणी केली जाते. राश्ट्रीय लोकसंख्या धोरणा अनुसार मलातील अंतर योग्य राहावे यासाठी स्त्रि आणि पुरूश त्यांच्या पसंतीनुसार कुटूंब नियोजनाच्या सुरक्षित प्रभावी आणि परवडणाऱ्या पध्दती निवडण्यासाठी त्यांना स्वतंत्रता दिली जाते. २०१० पर्यंत बालविवाह संपविण्याच्या दृश्टीकोणातून शिक्षणाचा प्रसार विवाह नोंदणी अनिवार्य विवाहचे सुरक्षित वय यासारख्या गोश्टीवर भर दिल्या जातो.

**पोशण**

बाल्यावस्था बालपण आणि पौगंडावस्थेतील तसेच प्रजनन

*अवस्थेतील महिलांमध्ये कुपोशणाचे प्रमाण वाढू नये यासाठी महिलांच्या पोशक आहार यावर लक्ष केंद्रित केल्या जातो. मुली, गरोदर स्त्रिया आणि स्तनपान देणाऱ्या स्त्रिया यांचे आरोग्य तसेच त्यांच्या लहान मुलांचे आरोग्य यांच्यातील संबंध लक्षात घेऊन त्यांना सेवा पुरविली जाते. घरातील स्त्रिया आणि मुली मधील पोशण विशयक भेदभाव योग्य धोरणाद्वारे दुर केल्या जातो घरातील पोस्टीक असंतुलन गरोदर स्तनपान करणाऱ्या महिलांच्या पोशण विशयक समस्या हाताळण्यासाठी सर्वसमावेशक पोशण शिक्षण सुरू केले आहे. या प्रणालीमध्ये नियोजन, देखरेख आणि वितरण यामध्ये महिलांच्या सहभागही सुनिश्चित केला आहे.*

***पिण्याचे पाणि आणि स्वच्छता***

*पाण्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे विविध प्रकारचे रोग महिलांना होत असतात हा दृश्टिकोन पुढे वून ग्रामीण आणि शहरी झोपडपट्ट्या मध्ये महिलांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणि, सांडपाण्याची विल्हेवाट शौचालय सुविधा आणि घराजवळील स्वच्छता या गोश्टीवर विशेश लेक्ष दिले जाते.*

***घर आणि निवारा***

*गृहनिर्माण धोरण गृहनिर्माण वसाहती नियोजन आणि ग्रामीण शहरी भागात निवारा तरतुद यामध्ये महिलांचाही समावेश केला जातो अविवाहित महिला नोकरदार, महिला विद्यार्थी, आणि प्रशिक्षणार्थी महिलांसाठी पुरेशा आणि सुरक्षित घराच्या व्यवस्थेवर विशेश लक्ष केंद्रीत केलेज जातात.*

***विज्ञान आणि तंत्रज्ञान***

*विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम राबवीले जातात. यामध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात विज्ञान विशय निवडण्यासाठी प्रवृत्त करणे. आणि विज्ञान-तंत्रज्ञानाचा समावेश असणाऱ्या प्रकल्पामध्ये महिलांना पूर्ण सहभाग घेण्याची प्रेरणा देणे वैज्ञानिक कृती आणि जागृकता विकसित करण्यासाठी देखील पावले उचलली जातात दळणवळण आणि महिती तंत्रज्ञान यासारख्या विशेश क्षमतेच्या क्षेत्रात त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक त्या योजना केल्या जातात. महिलांच्या गरजेनुसार आणि त्यांच्याकडून होणारी एकसूत्री कामे कमी करण्यासाठी योग्य तांत्रिक विकास केल्या जातो.*

***कठीण परिस्थितीतील महिला***

*अत्यंत गरिबीत जीवन जगत असलेल्या महिला, संघर्शाच्या परिस्थितीत असणाऱ्या महिला, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या महिला, अविकसित भागातील महिला, अपंग महिला, विधवा महिली, वृध्द महिला, अत्यंत कठण परिस्थितीत जीवन जगणाऱ्या अविवाहीत महिला, नोकरीतून काढून टाकलेल्या महिला, स्थलांतरित महिला, वैवाहिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिला, वंध्य महिला, वेश्या व्यवसायात काम करणाऱ्या महिला अशा विविध प्रकारच्या परिस्थितीत सापडलेल्या महिलांकरिता आवश्यक उपाय योजना आणि आवश्यक कार्यक्रम तयार केले जातात.*

***महिलांवरील हिंसाचार***

*सर्व प्रकारच्या हिंसा मग ते रीरिक किंवा मानसिक, महिलांवरील घरगुती असो किंवा सामाजिक मग ते परंपरेतून जन्माला आलेले असोत प्रभावीपणे हाताळले जातातत. पीडित महिलेला विविध प्रकारच्या संस्थांच्या माध्यमातून सहाय्य केले जाते. आणि अशा प्रकारच्या हिंसाचारावर प्रतिबंध ही केल्या जातो. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, हुंडा प्रथा यासारख्या घटनांनी पीडित महिलांचे पुनर्वसन करून दोशींवर कारवाई केली जाते. महिला आणि मुलींची विक्री, व्यापार होणार*

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 269-272
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCES
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करून महिलांना सहाय्य केल्या जातो.

**मुलींचे हक्क**

मुलींचा होणारा कोणत्याही प्रकारचा भेदभाव आणि तिच्या हक्काचे उलल्घंन होत असेल तर त्याला रद्द केल्या जातो. यासाठी घरात आणि घराबाहेर प्रतिबंधात्मक आणि दंडात्मक अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना केल्या जातात. लिंग निश्चिती,स्त्री-भ्रुणहत्या, बालविवाह, मुलींची गैरवर्तणूक, मुलींच्या विवाहात हुंडा मागणे, इत्यादीसाठी कडक नियम तयार केले आहेत, कुटुंबातील आणि कुटुंबाबाहेर मुलींच्या वागणुकीतील भेदभाव दूर करणे. आणि मुलगी असल्याची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यावर भर दिला जातो. मुलींच्या विविध गरजांवर विशेश लक्ष देऊन त्यांचे भरण-पोशण आरोग्य आणि शिक्षण, व्यवसायिक शिक्षण या क्षेत्रामध्ये योग्य वागणूक देऊन बालमजुरी संपविण्यासाठी विविध उपाय योजना आणि कार्यक्रम राबविले जातात.

**जनसंपर्क माध्यमे**

महिला आणि मुलींच्या प्रतिश्ठित प्रतिमेला आणि तिच्या अंगी असलेल्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी माध्यमाचा वापर केला जातो. महिलांचे चुकीचे, अपमानित, पारंपारिक, नकारात्मक, त्यांच्यावरील हिंसाराचार, चित्रण रोखले जाते. खाजगी क्षेत्रातील मीडिया नेटवर्क यांच्यात महिलांना समान सहभाग मिळावा यासाठीही प्रयत्न केले जातात.

**कार्यात्मक धोरणे- कृती योजना**

सर्व केंद्रीय आणि राज्य मंत्रालयातील महिला आणि बाल विकास विभाग तसेच राश्ट्रीय आणि राज्य महिला आयोग यांच्याशी सल्लामसलत करून विविध धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कालध्द कृती आराखडा तयार केल्या जातो या योजनेत विविध घटकांचा समावेश आहे.

**संस्थात्मक प्रणाली**

महिलांच्या प्रगतीला चालना देण्यासाठी ज्या केंद्र आणि राज्य स्तरावर संस्थात्मक प्रणाली आहेत त्यांना मजबूत केल्या आहेत. महिलांच्या प्रगतीकरिता जे विविध प्रकारचे धोरण ठरविले जातात यावर देखरेख ठेवण्यासाठी राश्ट्रीय परिशदेचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. तर राज्य परिशदेचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतात. आणि संबंधित विभाग, मंत्रालय, राश्ट्रीय आणि महिला आयोग, समाज कल्याण मंडळ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, महिला संस्था येथील सदस्यांचे सदस्य म्हणून निवड केली जाते. कार्पोरेट क्षेत्र, ट्रेड युनियन वित्तीय संस्था, शिक्षण तज्ञ, आणि सामाजिक कार्यकर्ते इत्यादी या संस्था वर्शातून दोनदा या धोरणाच्या अंमलबजावणीत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतात. महिलांसाठी राश्ट्रीय आणि राज्य संसाधन केंद्रे स्थापन केली आहे. ज्याव्दारे माहिती संकलन प्रसार चालु असलेले संशोधन कार्य सर्वेक्षन करणे. प्रशिक्षणाची अंमलबजावणी आणि जागृती निर्माण कार्यक्रम सुरू केले आहे. जिल्हा स्तरावरील संस्थांना बळकट केल्या जाते. अंगणवाडी गाव छोटे सहर यातील महिला बचत गटाच्या माध्यमातुन महिलांना मोठ्या प्रमाणात पाठबळ दिल्या जाते. महिला गटांना त्यांच्या स्वतःच्या नोंदनीकृत सोसायट्यां मध्ये संस्थात्मकिकरण आणि पंचायत महानगरपालिका स्तरावर गट स्थापन करण्यासाठी मदत केली आहे. बॅंका आणि वित्तीय संस्थांसारख्या सरकारी आणि गैरसरकारी माध्यमांद्वारे महिला बचत गटांना सहकार्य करून त्यांना सक्षम बनविण्याचे कार्य केले जाते.

**पंचायती राज संस्था**

संविधानाच्या ७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरूस्तीने राजकिय सत्ता संरचनेत महिलांची भागीदारी

वाढविण्यासाठी आणि सम्मान प्रवेशाची तरतूद केलेली आहे. सार्वजनिक जिवनात महिलांचा सहभाग वाढवण्याच्या प्रक्रीयेत ही घटना दुरूस्ती महत्त्वाची भुमिका बजावत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये तळागाळातील महिलांना आपला सहयोग देऊन, राष्ट्रीय धोरनाची अंमलबजावणी आणि अंमलबजावणी मध्ये सक्रीय सहभाग नोंदवून महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**निश्कर्श**

वरील योजनांवरून हे इतके स्पश्ट होते की, सरकार महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रदीर्घ काळापासून सर्व प्रकारचे प्रयत्न करत आहे आणि त्यामुळेच आज समाजातिल महिलांच्या भुमिकेतही अनेक बदल दिसून येत आहेत. आज क्वचितच असे कोणतेही क्षेत्र असेल जिथे महिलांनी आपली उपस्थिती नोंदवली नसेल. आगामी काळात बेटी बचाओ-बेटी पढाओ, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना, स्वाधार घर योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना आणि किशोरवयीन, मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना (सबला) यांचे सकारात्मक परिणाम सर्वांसामोर येतील, अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ :**

भारतीय महिला - नही दिशाये- संपादन- रोमी शर्मा- प्रकाशन विभाग सुचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार

आधुनिक समाज मे स्त्री-आशाराणी व्होरा-श्री नटराज प्रकाशन साऊथ नई दिल्ली ११००५३

कार्यशील महिला आहे हे भारतीय समाज डॉक्टर सुभाशचंद्र गुप्ता अर्जून पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली ११०००२

स्त्रोतः महिला आणि बालविकास मंत्रालय, भारत सरकार.